



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १२२ । किंमत - २ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार । २१/०५/२०२६ । पाने - ४




# 'मे हिट'चा वाढता तडाखा

## उष्माघातासह आजारांमध्ये वाढ

## जनजीवन विस्कळीत




युवावार्ता (प्रतिनिधी)

मे महिन्यातील कडक उन्हाने संगमनेरसह संपूर्ण जिल्ह्यात नागरिकांचे जनजीवन अक्षरशः विस्कळीत केले आहे. जिल्ह्यात तापमानाने पुन्हा ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला असून काही भागात ते ४२ ते ४३ अंशांपर्यंत पोहोचले आहे. संगमनेरमध्ये तापमानाचा पारा ४० पार पोहोचल्याने उष्णतेची तीव्रता अधिकच वाढली आहे. वाढत्या उष्णतेचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून उष्माघातासह विविध आजारांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे.

पहाटेपासूनच जाणवणारे कडक ऊन दुपारी असह्य होत आहे. उष्ण व कोरडे वारे आणि अंगाची लाहीलाही करणारे वातावरण यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. दुपारच्या वेळेत शहरातील रस्त्यांवर अक्षरशः अघोषित संचारबंदी असल्याचे चित्र दिसत आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचे तापमान पुणे आणि नाशिकलाही मागे टाकत असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या काही दिवसांत तापमानात सातत्याने वाढ होत असून त्याचा गंभीर परिणाम आरोग्यावर होत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, शेतमजूर आणि दिवसभर उन्हात काम करणाऱ्या कामगारांना उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्माघात, डोकेदुखी, प्रचंड थकवा, चक्कर येणे, उलट्या, शरीरातील पाण्याची कमतरता अशा तक्रारींमध्ये वाढ झाल्याने दवाखान्यांमध्ये रुग्णांची गर्दी वाढत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

रात्रीच्या वेळीदेखील उष्णतेच्या झळा कायम असल्याने नागरिकांना दिलासा मिळत नाही. त्यातच वीजपुरवठा खंडित झाल्यास उकाड्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून झोपेचेही खोळंबे होत आहे.

हवामान विभागाने पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय दुपारच्या वेळेत घराबाहेर पडू नये, भरपूर पाणी प्यावे, डोक्यावर टोपी किंवा कापड वापरावे आणि शरीरात पाण्याची कमतरता होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

उष्णतेकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. उष्माघाताची लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत.

# पाणी, वीज हक्काच्या प्रश्नासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुका हा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत व सततच्या विकास कामांमुळे प्रगतशील ठरला आहे. मात्र मागील काही दिवसांपासून राजकीय हेतूने तालुक्यातील जनतेला वेठीस धरण्याचा प्रयत्न सुरू आहे. हक्काचे पाणी, वीज मिळत नाही, तालुक्याला पिक विमा मिळाला नाही. संगमनेर तालुक्याला आपल्या हक्काचे पाणी मिळावे व रोटेशन काळात ११ तास पूर्ण दाबाने दिवसा वीज मिळावी या मागणीसाठी संगमनेर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना हे निवेदन देण्यात आले. यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, साखर संघाचे उपाध्यक्ष बाबासाहेब ओहोळ, शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे, फेडरेशनचे चेअरमन राजेंद्र गुंजाळ, अॅड. नानासाहेब शिंदे, मीननाथ वर्पे, विनोद हासे, सतीश वर्पे, गुलाबराव देशमुख, विलास शिंदे, अण्णासाहेब राहिंज, बाळासाहेब राहणे, नामदेव शिंदे, दादासाहेब देशमुख, भाऊसाहेब शिंदे, मुकेश काकड, दत्तात्रय वाघ, कैलास इंगळे, रावसाहेब काकड, जगन दिघे, शांताराम दिघे, कचरू लांडगे, नवनाथ देशमाने, भास्करराव पानसरे, शेखर वाघ, बाळासाहेब फापाळे यांच्यासह विविध कार्यकर्ते उपस्थित होते. यानंतर वीज वितरण विभागाचे मुख्य अधीक्षक अभियंता यांनाही आपल्या मागण्यांचे निवेदन त्यांनी दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर तालुका हा पर्जन्य छायेचा, अति दुष्काळी व डोंगराळ भाग असून दरवर्षी सरासरी कमी पाऊस पडतो. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संघर्षानंतर १९८९ मध्ये संगमनेर तालुक्याला हक्काचे ३०% पाणी मिळाले. १९८९ च्या पाटबंधारे विभागाच्या आदेशानुसार उपसा सिंचन योजना आवर्तन कालावधीमध्ये प्रतिदिन किमान १६ तास वीज अनिवार्य असताना वीज नियामक आयोगाने वीज पुरवठा बाबत असमर्थता दर्शवल्याने सर्वांचे म्हणणे ऐकून घेत २०१० मध्ये रोटेशन काळात ११ तास पूर्ण दाबाने वीज पुरवठा करण्याचे आदेश वीज मंडळाला दिले आहेत.

मात्र मागील दोन वर्षापासून वीज वितरण विभागाने आम्ही शेतकऱ्यांनी मागणी करूनही ११ तास वीज देण्याचे बंद केलेले आहे. कालवा सल्लागार समितीची बैठक होत नाही .पाटबंधारे विभाग जाणीवपूर्वक राजकीय दबावाखाली काम करत असून संगमनेरचे शेतकरी उध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहे. रोटेशन काळामध्ये वीज उपलब्धता कमी झाल्याने संगमनेरला हक्काचे पाणी उचलता येत नाही. परिणामी खालच्या भागास हे पाणी दिले जाते.

मागील दोन वर्षापासून निळवंडे कालव्यांचे काम पूर्ण झालेले असतानाही संगमनेरच्या शेतकऱ्यांना पाणी मिळण्याची कोणतीही सुविधा पाटबंधारे विभागाने केलेली नाही. त्यामुळे सर्व पाणी खालच्या भागात वापरले जात आहे.

# राज्यातील महामंडळाचे महिन्याभरात वाटप

## - देवेंद्र फडणवीस



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील महायुती सरकारकडून लवकरच बहुप्रतिक्षीत महामंडळ वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून महायुतीमधील अनेक नेते आणि पदाधिकारी हे महामंडळांच्या वाटपाकडे डोळे लावून बसले आहेत. अखेर महामंडळांचे वाटप करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: पुढाकार घेतला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी भाजप आणि मित्रपक्षांच्या नेत्यांना महामंडळांचे जागावाटप लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सध्या महायुतीचे नेते आणि पदाधिकारी यांच्यात आनंदाचे वातावरण आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, येत्या महिनाभरात राज्यातील महामंडळाचे जागावाटप पूर्ण होईल. महामंडळ वाटपाचा महायुतीचा फॉर्म्युला ठरला आहे. त्यानुसार, भाजपा ४८ टक्के, शिवसेना २९ टक्के आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २० टक्के महामंडळ, असे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. मात्र, कोणत्या पक्षाला कोणते महामंडळ मिळणार, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. येत्या महिनाभरात यावर शिक्कामोर्तब होईल. महायुतीच्या पुढील बैठकीत महामंडळातील सदस्य वाटप होईल, असे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत महामंडळ वाटपाच्या यादीवर अंतिम शिक्कामोर्तब होईल. यानंतर तिन्ही पक्षांचे नेते कोणत्या महामंडळावर कोणाची वर्णी लावायची हा निर्णय घेतील.

# संगमनेर कचरा डेपोला भीषण आग

## ५ ते ६ टन प्लास्टिक कचरा जळून खाक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शहरातील कचरा डेपोला मंगळवारी दुपारी भीषण आग लागल्याने सुमारे ५ ते ६ टन प्लास्टिक कचरा जळून खाक झाला. आगीनंतर परिसरात काळ्या धुराचे प्रचंड लोट पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक तास डेपो परिसर धुराने वेढलेला होता, तर आगीच्या ज्वाळा आणि धगधगत्या कचऱ्यामुळे परिस्थिती गंभीर बनली होती.

नगरपालिकेमार्फत शहरातील ओला व सुका कचरा वेगळा करून त्यावर प्रक्रिया केली जाते. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार केले जाते, तर प्लास्टिक कचरा सिन्नर येथील एका कंपनीमार्फत प्रक्रिया करण्यासाठी पाठवला जातो. मात्र, मागील दोन ते तीन दिवसांपासून संबंधित कंपनीचे कचरा वाहतूक वाहन न आल्याने मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा डेपोमध्ये साचून राहिला होता.

याच दरम्यान मंगळवारी अचानक आग लागल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली. डेपोमध्ये प्लास्टिक कचरा, डिओड्रंट व बॉडी स्प्रेचे रिकामे डबे, सुकलेली झुडपे, बायोमास तसेच इतर ज्वलनशील पदार्थ मोठ्या प्रमाणात असल्याने आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी वाढते तापमान, कचऱ्यातील ज्वलनशील घटक किंवा मानवी निष्काळजीपणा यापैकी एखादे कारण असू शकते, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. शहरातून दररोज सुमारे ३५ टन कचरा संकलित केला जात असल्याची माहिती मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी दिली. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या आणि युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले. अथक प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणण्यात यश आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कचरा व्यवस्थापनातील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# फक्त गुन्हे उघडकीस नाही... मुद्देमालही मिळाला पाहिजे!

## एसपी मुम्मका सुदर्शन यांचा पोलिसांना कडक इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर नुकताच पदभार स्वीकारलेल्या पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पोलिसांना स्पष्ट आणि कडक शब्दांत सज्जड इशारा दिला आहे. फक्त गुन्हे उघडकीस आणून चालणार नाही तर त्या गुन्ह्यातील चोरीचा माल आणि मुद्देमाल हस्तगत करून तो फिर्यादीला परत मिळवून देणे हेच पोलिसांच्या कामाचे खरे यश आहे असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच झालेल्या मासिक गुन्हे आढावा बैठकीत अधीक्षक सुदर्शन यांनी जिल्ह्यातील वाढत्या प्रलंबित गुन्ह्यांवर चिंता व्यक्त करत त्यांच्या जलद निपटाऱ्यावर भर देण्याचे आदेश दिले. जिल्ह्यात गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण मोठे असताना उघडकीस येणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. त्यामुळे प्रत्येक पोलीस ठाण्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या समन्वयाने अधिक आक्रमक आणि प्रभावी तपास मोहीम राबवावी, असे आदेश त्यांनी दिले. गुन्हे उघडकीस आणण्याबरोबरच त्यातील चोरीचा माल जप्त करून नागरिकांचा विश्वास जिंकण्यावर भर देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, शहर उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्यासह शहरातील विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, नागरिकांच्या तक्रारींकडे होणाऱ्या दुर्लक्षाबाबतही अधीक्षक सुदर्शन यांनी गंभीर भूमिका घेतली. प्रत्येक नागरिक तक्रार घेऊन पोलीस ठाण्यात येतो, तेव्हा त्याच्या तक्रारीची दखल घेतलीच पाहिजे. तक्रार निवारण हे पोलिसांच्या प्राधान्यक्रमात असले पाहिजे, असे स्पष्ट करत त्यांनी आठवड्यातून एक दिवस तक्रार निवारण दिन म्हणून राबविण्याचे निर्देश दिले.









## संपादकीय...

# मोबाईलच्या पडद्याआड हरवत चाललेलं बालपण

आजचं युग विज्ञान, तंत्रज्ञान आणि आभासी दुनियेचं युग म्हणून ओळखलं जातं. कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट, सोशल मीडिया, ऑनलाइन शिक्षण आणि डिजिटल साधनांनी मानवी जीवन अधिक वेगवान आणि सोयीस्कर केलं आहे. जग एका क्लिकवर आलं आहे. मात्र या प्रगतीची दुसरी बाजूही तितकीच गंभीर आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या अतिरेकामुळे आजचं खरंखुरं बालपण हरवत चाललं आहे. विशेषतः मोबाईल आणि इंटरनेटच्या विळख्यात अडकलेल्या नव्या पिढीचं आयुष्य आता चार भिंतींमध्ये आणि स्क्रीनच्या प्रकाशात बंदिस्त होत असल्याचं चित्र दिसत आहे. एक काळ असा होता की उन्हाळी सुट्टी लागली की गावातील रस्ते, शाळांची आवारं, मंदिरांच्या ओट्या आणि मोकळी मैदाने मुलांच्या खेळांनी गजबजून जात असत. कुठे गोट्यांचे डाव रंगायचे, कुठे विटीदांडूचा जल्लोष असायचा, तर कुठे लंगडी, आट्यापाट्या, भोवरे आणि लपंडावाच्या खेळांतून बालपण फुलत असे. त्या खेळांतून मुलं फक्त आनंद घेत नव्हती, तर जीवनाचे धडेही शिकत होती. हरणं, जिंकणं, नियम पाळणं, मित्रांसोबत राहणं, सहकार्य करणं आणि संकटात एकमेकांच्या पाठीशी उभं राहणं हे सारे संस्कार त्या खेळांतून नकळत घडत होते. परंतु आज परिस्थिती पूर्णतः बदलली आहे. आजच्या मुलांच्या आयुष्यात मोबाईल, टीव्ही, सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेम्स यांनी इतकी मोठी जागा व्यापली आहे की प्रत्यक्ष खेळ, संवाद आणि सामाजिक नाती दुय्यम ठरत आहेत. सकाळी डोळे उघडताच मोबाईल हातात घेतला जातो आणि रात्री झोपेपर्यंत स्क्रीनपासून दूर जाणं अनेकांना अशक्य झालं आहे. अभ्यास, मनोरंजन, मैत्री, संवाद आणि करमणूक या सगळ्याच गोष्टी आता एका छोट्याशा स्क्रीनमध्ये बंदिस्त झाल्या आहेत. मोबाईलचा योग्य आणि मर्यादित वापर नक्कीच उपयुक्त आहे. ऑनलाइन शिक्षण, माहितीचा झपाट्याने होणारा प्रसार आणि तंत्रज्ञानाची ओळख या गोष्टी आधुनिक काळाची गरज आहेत. पण अतिरेक झाला की तेच साधन घातक ठरतं. आज अनेक मुलांमध्ये चिडचिडेपणा, एकटेपणा, आळस, नैराश्य, राग आणि असहिष्णुता वाढताना दिसत आहे. झोपेचा अभाव, डोळ्यांचे विकार, लठ्ठपणा आणि शारीरिक हालचालींची कमतरता यांसारख्या समस्या गंभीर होत आहेत. मानसिक आरोग्यावरही त्याचा मोठा परिणाम होत असून सोशल मीडियावरील आभासी जग मुलांना वास्तवापासून दूर नेत आहे.

विशेष म्हणजे, सोशल मीडियावर मिळणारे ‘लाईक्स’ आणि ‘फॉलोअर्स’ आता आत्मविश्वासाचं मोजमाप बनू लागले आहेत. व्हर्च्युअल मित्र खऱ्या मित्रांची जागा घेत आहेत. त्यामुळे संवेदनशीलता, सहवास, संवाद आणि एकोप्याचं महत्त्व कमी होत चाललं आहे. अनेक मुलं कुटुंबात राहूनही मानसिकदृष्ट्या एकटी पडत आहेत. पालक आणि मुलांमधील संवाद कमी होणं हीदेखील चिंतेची बाब आहे. मैदानी खेळ हे केवळ वेळ घालवण्याचं साधन नव्हतं, तर ती एक जीवनशाळा होती. विटीदांडूच्या एका चुकीच्या फटक्यावर संपूर्ण संघ एकत्र येत असे. लंगडीमध्ये एखादा पाय चुकला तरी मित्र हसतखेळत पुन्हा संधी देत. या छोट्या छोट्या प्रसंगांतून संयम, मैत्री, सहकार्य आणि जिद्द यांसारखी मूल्यं रुजत होती. आज मात्र मुलांना अनेक पारंपरिक खेळांची नावंसुद्धा माहिती नाहीत, ही समाजासाठी धोक्याची घंटा आहे. यासाठी सर्वप्रथम पालकांनी जागरूक होण्याची गरज आहे. मुलांच्या हातात वेळ घालवण्यासाठी मोबाईल देण्याऐवजी त्यांना मैदानावर घेऊन जाणं, संवाद साधणं आणि कुटुंबासोबत वेळ घालवण्याची सवय लावणं आवश्यक आहे. शाळांनीही पारंपरिक खेळ, क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन द्यायला हवं. शहरांमध्ये कमी होत चाललेली मैदाने जपणं हीदेखील शासन आणि समाजाची मोठी जबाबदारी आहे. तंत्रज्ञानाला पूर्णपणे दोष देऊन चालणार नाही, कारण ते काळाची गरज आहे. मात्र तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवणं आणि त्याचा संतुलित वापर करणं हे अधिक महत्त्वाचं आहे. अन्यथा भविष्यात आपल्या समाजाला भावनाहीन, एकाकी आणि यंत्रवत पिढीचा सामना करावा लागू शकतो.

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
ZAKIR HUSAIN MOHAMMED HANIF SHAIKH

**NEW NAME AS**
ZAKIR MOHAMMAD HANIF SHAIKH

ADD – DILLI NAKA , GALANDE MALA , BHARAT NAGAR , SANGAMNER, TAL- SANGAMNER, DIST- AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
NAZIYA SH MUNAF SHAIKH

**NEW NAME AS**
NAZIYA IMTIYAZ TAMBOLI

ADD –TAMBOLI VASTI, AT POST- SAKUR TAL- SANGAMNER , DIST- AHMEDNAGAR

# विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित प्रश्नांसाठी आंदोलन सुरु केले असून सहा टप्प्यांमध्ये हे आंदोलन केले जाणार असल्याची माहिती संघटनेचे पुणे विभागीय सचिव किशोर धुमाळ, विभागीय सदस्य शिवदत्त बंगाळ यांनी दिली असून राज्यातील सर्व महाविद्यालयातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या आंदोलनास सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर मिळणारी आश्वासित प्रगती योजना तात्काळ लागू करावी, राज्य सार्वजनिक विद्यापीठांतील उर्वरीत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग तात्काळ लागू करण्यात यावा, सन २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊन २००५ नंतर नियुक्ती मिळालेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योगना लागू करण्यात यावी, सेवानिवृत्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देय असलेले रजा रोखीकरण सातव्या वेतन आयोगानुसार अंतिम वेतनाच्या आधारे अदा करण्यात यावे, महाविद्यालयांतील रिक्त शिक्षकेत्तर पदे भरण्यास तात्काळ मंजुरी देण्यात यावी, प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांना रजा रोखीकरणाचे लाभ पुर्ववत सुरु करावे, न्यायप्रविष्ठ नसलेल्या महाविद्यालयीन प्रयोगशाळा सहाय्यक यांची शासन निर्णय दि. २२/०९/२०२५ नुसार सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार ग्रेड पे २४०० नुसार वेतननिश्चिती करण्यात यावी इत्यादी मागण्यांसाठी हे आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात काळ्या फिती लावून कामकाज करण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात दि.१८ ते २० मे २०२६ या कालावधीत दुपारच्या सुट्टीत धरणे, निषेध सभा व घोषणाबाजी करणे, दि.२५ मे २०२६ रोजी राज्यव्यापी एकदिवसीय लेखणी बंद आंदोलन, दि.२९ मे २०२६ रोजी विभागीय सहसंचालक कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन, दि. १ जून २०२६ रोजी एक दिवसासाठी लाक्षणिक कामबंद आंदोलन केले जाणार असून मागण्या मान्य न झाल्यास दि. ८ जून २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे.

# रामचंद्र संभाजी जाधव यांचे वृद्धापकाळाने निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जोर्वे येथील ज्येष्ठ नागरिक तथा जुन्या पिढीतील मनमिळावू शेतकरी रामचंद्र संभाजी जाधव यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कै. रामचंद्र जाधव हे सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय सहभाग घेणारे, सर्वांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या निधनाने कुटुंबासह परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर जोर्वे येथे प्रवरा नदी तीरावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी गं.भा. चंद्रभागा रामचंद्र जाधव, पुत्र अशोक रामचंद्र जाधव (संचालक, जय श्रीराम सुपरशॉपी, गणेश नगर), केशव रामचंद्र जाधव, राजेंद्र रामचंद्र जाधव, कन्या सौ. इंदुमती अर्जुन वैद्य, सौ. मथुरा सोपान थिटमे तसेच पुतणे, पुतण्या, भाची, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. रामचंद्र संभाजी जाधव यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# चंदनापुरीच्या साई मंदिराच्या तृतीय वर्धापन दिनाचे आयोजन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील चंदनापुरी येथील प्रसिद्ध साईधाम मंदिरात सोमवारी दि.१८ मे ते सोमवार दि.२५ मे, २०२६ पर्यंत तृतीय वर्धापन दिनानिमित्त श्री साईसत्चरित्र पारायण आणि कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पुणे - नाशिक महामार्गलगत वसलेल्या चंदनापुरी येथे श्री साईबाबांनी वास्तव्य केले असल्याचे जुने जाणते सांगतात. साईबाबांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या गावात सुंदर भव्य मंदिर साकारून मूर्तीची प्राणप्रतिष्ठा मोठ्या उत्साहात तीन वर्षांपूर्वी करण्यात आलेली आहे. मंदिराबरोबरच याठिकाणी पायी दिंडी जाणाऱ्या भाविकांसाठी निवास, स्वयंपाकघर व स्नानगृह, अंघोळीला गरम पाण्यासाठी भव्य असे सोलर बसवण्यात आले आहे. त्याचेही लोकार्पण करण्यात आलेले आहे. वर्षभर अनेक साईभक्त, वारकरी व जैन साधू-साध्वी यांनी येथे वास्तव्य करून सुविधांचा लाभ घेत असतात. दररोज दोनवेळेस आरती, दर गुरुवारी साईसत्चरित्र पारायण, महाआरती व प्रसाद तसेच दरवर्षी श्री चंदनापुरी ते शिर्डी अशी पायी दिंडी जात असते असे उपक्रम राबवण्यात येतात. त्यास भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून दिवसेंदिवस या ठिकाणी दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत आहे

या मंदिराच्या तृतीय वर्षपूर्तीनिमित्त वर्धापन दिन साजरा करणार असून यानिमित्ताने दररोज सकाळी ८ ते ११यावेळेत साईभक्त गणेश महाराज मुसमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली साईसत्चरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे तर सायंकाळी ७ ते ९ या काळात शनिवारी (दि. २३) ह.भ.प. गणेश महाराज एरंडे रविवारी (दि. २४) ह.भ. प दीपक महाराज देशमुख, सोमवारी (दि.२५) ह.भ. प अमृत महाराज जोशी यांच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. त्यानंतर भव्य महाप्रसादाने आयोजन केले आहे. तरी या कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ चंदनापुरी, श्री साई मुळगंगा भक्त परिवार यांनी केले आहे.

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

# पाण्यापासून वंचित ठेवणाऱ्यांनी ऊस लावण्याचा सल्ला देऊ नये - रऊफ शेख




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -चाळीस वर्षापासून सर्व सतास्थाने ताब्यात असतानाही साकूर पठार भागातील जनतेला ज्यांना पाणी देता आले नाही त्यांनी या भागात येऊन बिन पाण्याचा ऊस लावण्याचा सल्ला देऊ नयेत अशी टिका भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांनी माजी आमदार बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता केली.

साकूर येथील मेळाव्यात पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ पाटील यांच्यावर केलेल्या टिकेचा समाचार घेताना रऊफ शेख म्हणाले की, साकूर पठार भागाला जर पाणी उपलब्ध असते तर ऊस विकास मेळावे घेण्याची वेळच तुमच्यावर आली नसती. मुळा नदीवर जे काही बंधारे झाले ते सर्व बंधारे माजी मंत्री स्व. मधुकर पिचड यांच्या कार्यकाळात झाले आहेत त्यामध्ये तुमचे योगदान काहीच नाही. माझे वडील स्व. सिराजभाई शेख हे पिचड यांचे खंदे समर्थक म्हणुन या भागात कार्यरत होते. २००९ मध्ये मतदारसंघ पुनर्रचना होऊन या भागाचा समावेश संगमनेर विधानसभा मतदारसंघात झाल्यानंतर आपल्या काळात एकही नवीन बंधारा मागील सतरा वर्षांच्या काळात मुळा नदीवर बांधला गेला नाही हे आपले अपयश लोकांना माहीत आहे. त्यामुळे मुळा नदीवरील बंधाऱ्यांचे खोटे श्रेय आपण घेऊ नये. तसेच पिंपळगाव खांड धरणाचा प्रकल्प होत असताना आपण स्वत: राज्य मंत्रिमंडळात असताना आपल्याला या पठार भागाचा समावेश लाभक्षेत्रात करता आला नाही हे आपले योगदान पठारभागातील जनता विसरलेली नाही.पाणी नसल्यामुळे या भागा तील शेतकर्यांच्या दोन-तीन पिढ्या बरबाद झाल्या आहेत.मात्र यापुढे आता असे होणार नाही. राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री. राधाकृष्ण विखे पा.आणि आ. खताळ यांच्या माध्यमातुन उपसा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून या साकुर पठार भागाचा पाणी प्रश्न आम्ही सोडवणारच असून याकामी नूसते आश्वासनच नाहीतर सर्व्हेक्षणाची प्रक्रीया सुद्धा पूर्ण झाली असल्याचे रऊफ शेख यांनी सांगितले.

साकुर पठारभागातील रद्द झालेले रस्ते आ. खताळयांनी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्या माध्यमातुन पुन्हा मंजुर करून आणले आहेत. पठार भागात मोठ्या प्रमाणावरती विकासकामे सुरु केली आहेत ,त्यामुळे या रस्त्यांचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न आपण करु नये. अशी टीका रऊफ शेख यांनी केली. परंतु गेली ४० वर्षे तुम्हाला या भागातील तरुणांना रोजगाराच्या संधी देता आल्या नाहीत. आता तुम्ही त्यांना काय रोजगार मिळवून देणार असा प्रश्न शेख यांनी केला आहे.

# अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी तुकाराम मुंढे



मुंबई (वृत्तसंस्था)

प्रशासन सेवेतील (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदल्या करतानाच सरकारने वादळी कार्यशैलीसाठी प्रसिद्ध असलेले अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादितच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून रुबल अगरवाल यांची बदली झाली आहे.

याशिवाय, मुंबई महानगर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे येथील मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्रीधर डुबे-पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदाची सूत्रे बाबासाहेब बेलदार यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत, तर हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी आर. एस. चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/ ५४८ /२०२६
संगमनेर, दिनांक – १५/०५/२०२६

## जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. शेख मोहसिन अनवर रा. कुरण, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०६/०४/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा.कुरण, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे शेख मोहसिन अनवर यांचा जन्म मौजे कुरण, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २०/१०/१९९० रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरण यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पिंपळगाव देपा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/ ५५१ /२०२६
संगमनेर, दिनांक – १५/०५/२०२६

## जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. इस्लाम इस्माईल बागवान, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०४/०५/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे इस्लाम इस्माईल बागवान यांचा जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २८/०९/१९७७ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पिंपळगाव देपा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**







**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - 01
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**त्वरित पाहिजेत**
पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा
पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी
8888808397

**पाहिजेत**
स्वयंपाकीन – ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)
ड्रायव्हर – ०१
क्लार्क – ०१ (लेडीज/जेन्ट्स)
वॉचमन – ०१
अनुभवास प्राधान्य
9822334431

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६













# अधिकमासानिमित्त गुंजाळवाडीत भक्तीचा महासागर

## गगनगिरी महाराजांच्या प्रेरणेतून आठव्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



**सदर सप्ताह अधिकमास अर्थात पुरुषोत्तम मासात गेल्या सात वर्षांपासून सातत्याने आयोजित केला जात आहे. यंदा या अखंड हरिनाम सप्ताहाचे आठवे वर्ष असून अधिकमासाच्या शेवटच्या आठवड्यात भक्तिमय वातावरणात हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती समिती प्रमुख तथा उद्योजक दिलीप शिंदे आणि एस. आर. डेअरीचे प्रमुख आबासाहेब थोरात, कपिल पवार यांनी दिली.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प. पू. स्वामी श्री चैतन्य गगनगिरी महाराज यांच्या प्रेरणेतून गगनगिरी महाराज भक्त परिवार, गुंजाळवाडी ग्रामस्थ व अखंड हरिनाम सप्ताह समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा होत असून पंचक्रोशीतील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विश्वगौरव विभूषित महायोगी प. पू. स्वामी श्री गगनगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने ८ व्या पर्वाचा अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी श्रीराम कथेच्या आयोजनासह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, भव्य कीर्तन, हरिपाठ, व्याख्यानासह कृषी प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. दि. ८ जून ते १५ जून २०२६ दरम्यान होणाऱ्या संपूर्ण सप्ताहात दररोज सायंकाळी ७ ते १० यावेळेत ह. भ. प. रामराव महाराज ढोक यांच्या रामकथेमुळे भाविकांना भक्ती व अध्यात्माची अनुभूती लाभणार असल्याने संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरणाची निर्मिती झाली आहे.

भाविकांसाठी बुधवार दि. १० रोजी आद्य शंकराचार्य यांच्या पादुकांचे दर्शन ठेवण्यात आले आहे. या सोबतच दररोज सकाळी ११ वा. बुध दि.१० नंदकुमारजी पोवार, गुरू दि. ११ इंद्रजीत देशमुख, शुक्र दि. १२ डॉ. संजय मालपाणी, शनि दि. १३ भास्कर पेरे पाटील व रवि दि. १४ ला शालिनीताई देशमुख इंदुरीकर यांच्या व्याख्यानांतून समाजप्रबोधन व संस्कारांची मेजवानी लाभणार आहे.

या सप्ताहात दुपारी तीन वाजता अनेक नामवंताची कीर्तन सेवा लाभणार आहे. ८ जून ला ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, ९ ला संजय महाराज पाचपोर, १० ला जयंत महाराज पाटील, ११ जून ला विशाल महाराज खोले, तर १२ ला सोमनाथ महाराज शास्त्री सानप, १३ ला उद्धव महाराज मंडलिक १४ ला ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर कीर्तनकारांची सेवा होणार असून दुसऱ्या दिवशी त्यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

सप्ताहादरम्यान गगन भरारी कृषी महोत्सवाचेही आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील १०५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग असणार आहे. दि. ९ जून रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी श्री नरेंद्र महाराज यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. आधुनिक शेती, तंत्रज्ञान व ग्रामीण संस्कृतीचा संगम या महोत्सवातून अनुभवायला मिळणार आहे.

सप्ताहाच्या तयारीसाठी गावोगावी जनजागृती सुरू असून एस.आर. थोरात डेअरीचे प्रमुख आबासाहेब थोरात, दिलीप शिंदे व समितीचे पदाधिकारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. भक्ती, संस्कार, अध्यात्म आणि समाजप्रबोधनाचा संगम असलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहामुळे आध्यात्मिक ऊर्जा देणारी पर्वणी ठरणार आहे.

# अकरावीला ९ लाख ५४ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी

पुणे (वृत्तसंस्था)

इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेसाठी यंदा राज्यात २० लाख ६९ हजार ९४६ इतक्या जागा उपलब्ध असून आतापर्यंत ९ लाख ५४ हजार ८६७ विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग १ व भाग २ भरून पूर्ण केला आहे. कोटा फेरीला (शून्य फेरी) सुरुवात झाली असून आतापर्यंत ३६ हजार २६४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.

राज्यात इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेचे यंदाचे दुसरे वर्ष आहे. प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर झाले असून शून्य फेरी राबवण्यात येत आहे. यंदा ९ हजार २६३ कनिष्ठ महाविद्यालयांनी अकरावीची नोंदणी केली आहे.

दहावीच्या निकालआधी अर्जनोंदणी सुरू करण्यात आली होती. तसेच दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अर्ज भाग १ व भाग २ ऑनलाइन भरण्यासाठी संकेतस्थळ सुरू करण्यात आले. शून्य फेरीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या तारखेपासून ३ आठवड्यांच्या आत शाळा सोडल्याचा दाखला प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

प्रवेशाच्या नियमित तीन फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी व पाचवी मुलींसाठी विशेष फेरी अशा प्रकारे प्रवेशप्रक्रियेचे नियोजन करण्यात आले आहे. नियमित प्रवेशप्रक्रियेसाठी अकरावीच्या १६ लाख १० हजार २९३ इतक्या जागा उपलब्ध आहेत. कोटा प्रवेशप्रक्रियेसाठी ४ लाख ५९ हजार ६५३ इतक्या जागा उपलब्ध आहेत. दोन्ही मिळून २० लाख ६९ हजार ९४६ जागांसाठी प्रवेशप्रक्रिया राबवली जात आहे.






# पार्वतीबाई शंकरपुरी गोसावी यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार काशिनाथ गोसावी यांच्या मातोश्री पार्वतीबाई शंकरपुरी गोसावी (वय ९५) यांचे आज बुधवारी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कै. पार्वतीबाई गोसावी या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्यावर दुपारी खांडगाव येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, पत्रकारिता तसेच विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. पार्वतीबाई गोसावी यांच्या पश्चात कैलास, काशिनाथ व गोविंद शंकरपुरी गोसावी हे तीन पुत्र, चार कन्या, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. पार्वतीबाई शंकरपुरी गोसावी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू; आचारसंहिता लागू

(जिल्हा माहिती कार्यालय)

अहिल्यानगर- भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०२६ जाहीर केली असून अहिल्यानगर जिल्ह्यात निवडणुकीची आचारसंहिता सुरु झाली आहे. निवडणूक शांततापूर्ण, पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) दत्तात्रय कवितके, तहसीलदार श्वेता संचेती, नायब तहसीलदार विशाल सदनापूर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, या निवडणुकीसाठी दि. २५ मे २०२६ रोजी अधिसूचना जारी करण्यात येणार असून दि. १ जूनपर्यंत उमेदवारांना नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत. दि. २ जून रोजी अर्जांची छाननी होणार असून दि. ४ जून ही अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत राहणार आहे. दि. १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. तर २२ जून रोजी मतमोजणी होऊन २५ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

नामनिर्देशनपत्रे जिल्हाधिकारी यांचे दालन, दुसरा मजला जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराचे महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही विधानसभा मतदारसंघात नाव असणे बंधनकारक असून त्याची साक्षांकित प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट, नगरपरिषदा व नगरपंचायतींचे सदस्य मतदार म्हणून सहभागी होणार आहेत.



अहिल्यानगर महानगरपालिका, संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी, देवळाली प्रवरा, पाथर्डी, श्रीगोंदा, शिर्डी, शेवगाव, नेवासा, कर्जत, अकोले, जामखेड व पारनेर येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांचा या निवडणुकीत मतदार म्हणून समावेश आहे. एकूण ४६१ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

निवडणुकीसाठी मतपत्रिकेचा वापर करण्यात येणार असून मतदारांनी पसंती क्रमानुसार मतदान करावयाचे आहे. मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक जम्बो बॅलेट बॉक्सची व्यवस्था करण्यात आली असून मतदान केंद्रांची व्यवस्था संबंधित तहसील कार्यालयांमध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्यात तहसीलदार यांच्या कक्षात मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. तर या निवडणुकीची मतमोजणी जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे. निवडणुकीसाठी खुल्या प्रवर्गासाठी १० हजार रुपये तर अनुसूचित जाती, जमातीसाठी ५ हजार रुपये इतकी अनामत रक्कम असणार आहे.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले असून महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ तसेच भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सार्वजनिक अथवा खासगी मालमत्तेवर अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके, झेंडे किंवा घोषणा लावण्यास बंदी घालण्यात आली आहे.

नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहितीही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिली.


















दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com










# संगमनेरच्या सुपुत्राचा जागतिक स्तरावर पराक्रम

## उद्योजक समाधान वाकचौरे यांनी पूर्ण केली 'आयर्नमॅन दा नांग 140.6' स्पर्धा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिद्द, चिकाटी, शिस्त आणि अथक मेहनतीच्या जोरावर संगमनेरच्या सुपुत्राने आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानास्पद यश संपादन केले आहे. संगमनेर येथील उद्योजक समाधान वाकचौरे यांनी व्हिएतनाममध्ये आयोजित करण्यात आलेली अत्यंत प्रतिष्ठेची आणि जगातील सर्वात कठीण समजली जाणारी IRONMAN Da Nang 140.6 ही फुल आयर्नमॅन स्पर्धा तब्बल १३ तास २७ मिनिटांत यशस्वीरीत्या पूर्ण करून संगमनेरचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले आहे. या स्पर्धेमध्ये स्पर्धकांना सलग एकाच दिवशी ३.८ किलोमीटर समुद्रात पोहणे, १८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२.२ किलोमीटरची पूर्ण मॅरेथॉन धाव पूर्ण करावी लागते. मानसिक व शारीरिक क्षमतेची अत्युच्च परीक्षा पाहणाऱ्या या स्पर्धेला जगातील सर्वात कठीण एंड्युरन्स स्पर्धांपैकी एक मानले जाते.

समाधान वाकचौरे यांनी हे यश केवळ स्वतःसाठी नव्हे, तर संगमनेरच्या युवकांसाठी प्रेरणादायी ठरेल अशा पद्धतीने मिळविले आहे. अनेक महिन्यांच्या कठोर सराव, नियमित प्रशिक्षण, योग्य आहार, वेळेचे व्यवस्थापन, त्याग आणि प्रचंड आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी हा अविश्वसनीय टप्पा गाठला. व्यवसाय सांभाळत असतानाच त्यांनी शारीरिक तंदुरुस्ती आणि क्रीडा क्षेत्रात सातत्य राखत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेत





सहभाग नोंदवून उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या यशामुळे संगमनेरसह संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध सामाजिक, क्रीडा, व्यावसायिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे कौतुक केले जात आहे.

स्पर्धेनंतर भावना व्यक्त करताना समाधान वाकचौरे यांनी सांगितले की, हा प्रवास अत्यंत कठीण होता; पण प्रत्येक क्षणी कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी, प्रशिक्षक आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे पाठबळ मला मिळाले. अनेकांनी माझ्यासाठी प्रार्थना केली, स्पर्धेचे ट्रॅकिंग करून प्रोत्साहन दिले. हे यश माझे एकट्याचे नसून सर्वांच्या प्रेम, आशीर्वाद आणि विश्वासाचे फलित आहे. हा फक्त प्रारंभ आहे. त्यांच्या या प्रेरणादायी यशामुळे संगमनेरमधील युवकांमध्ये फिटनेस, क्रीडा आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांबाबत नवचैतन्य निर्माण झाले असून अशक्य काहीच नाही हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला आहे.

# नेहरू गार्डन शॉपिंग कॉम्प्लेक्स कारवाईवरून राजकीय वातावरण तापले

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपालिकेच्या नेहरू गार्डन परिसरातील शॉपिंग कॉम्प्लेक्सवरील संभाव्य कारवाईवरून शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. गाळेधारकांवर अन्यायकारक कारवाई होत असल्याचा आरोप करत शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी पदवीधर आमदार सत्यजित तांबे आणि नगराध्यक्ष मैथिली तांबे यांना पत्राद्वारे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

नगरपालिकेने सादर केलेल्या कथित ऑडिट अहवालाच्या आधारे शॉपिंग कॉम्प्लेक्स धोकादायक असल्याचे सांगत पाडकामाची प्रक्रिया सुरू केली असून गाळेधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात इमारत सुस्थितीत असून नागरिकांना कोणताही तातडीचा धोका नसल्याचा दावा कतारी यांनी केला आहे. या गाळ्यांमधून नगरपालिकेला दरवर्षी सुमारे १० लाख रुपयांचे उत्पन्न मिळत असताना ठराव क्र. ७९/२०२६ च्या आधारे अचानक कारवाई का केली जात आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. गेल्या २० ते २५ वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांवर अन्याय होत असल्याचाही आरोप त्यांनी केला.

कतारी यांनी पालिकेच्या संगमनेर व्हिजन २.० वर प्रश्नचिन्ह उपस्थित करत शहरातील अस्वच्छता, वाहतूक समस्या व आरक्षित जमिनींचे प्रश्न सोडवण्याऐवजी प्रशासन लहान दुकानदारांना लक्ष्य करत असल्याची टीका केली आहे. तसेच संबंधित ऑडिट अहवालाची निष्पक्ष चौकशी करावी, गाळेधारकांशी चर्चा करून ठराव क्र. ७९ रद्द करावा आणि तोपर्यंत कारवाई स्थगित ठेवावी, अशी मागणी त्यांनी निवेदनातून केली.




# संगमनेरमध्ये मणके आणि अस्थिरोग उपचारांसाठी कानवडे हॉस्पिटल बनलं विश्वासाचं केंद्र

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर शहरामध्ये कार्यरत असलेले कानवडे हॉस्पिटल अँड स्पाईन केअर सेंटर हे परिसरातील नागरिकांसाठी आधुनिक आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा देणारे महत्त्वाचे रुग्णालय ठरत आहे. डॉ. बाळासाहेब कानवडे यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या रुग्णालयाने डॉ. सुजय कानवडे आणि डॉ. स्नेहल कानवडे यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पावधीतच संगमनेर आणि आसपासच्या ग्रामीण भागातील रुग्णांचा विश्वास संपादन केला आहे.

डॉ. सुजय कानवडे हे संगमनेरमधील नामांकित स्पाईन स्पेशालिस्ट आणि ऑर्थोपेडिक सर्जन म्हणून ओळखले जातात. त्यांनी एम.बी.बी.एस. आणि डी.ऑर्थो हे शिक्षण पूर्ण केले असून स्पाईन आणि पेन मॅनेजमेंटमध्ये फेलोशिप प्राप्त केली आहे. सध्या ते कानवडे हॉस्पिटल, संगमनेर येथे कन्सल्टंट स्पाईन सर्जन म्हणून कार्यरत आहेत. स्पाईन आणि ऑर्थोपेडिक उपचार क्षेत्रात त्यांना चार वर्षांहून अधिक अनुभव असून महाराष्ट्रामध्ये बायपोर्टल एंडोस्कोपिक पद्धतीने सर्वाधिक शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांपैकी ते एक मानले जातात.

त्यांनी एमबीबीएस शिक्षण दावाओ मेडिकल स्कूल फाउंडेशन, फिलिपाईन्स येथे पूर्ण केले असून पदव्युत्तर शिक्षण महात्मा गांधी मिशन (एमजीएम), औरंगाबाद येथे घेतले आहे. तसेच युनायटेड सिग्मा हॉस्पिटल आणि सेंच्युरी हॉस्पिटल येथे फेलोशिप पूर्ण केली आहे. रुग्णांच्या उपचारामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, अचूक निदान आणि रुग्णांशी आत्मीयतेने संवाद साधणे ही त्यांची विशेष ओळख मानली जाते.

कानवडे हॉस्पिटलमध्ये विशेषतः स्पाईन आणि ऑर्थोपेडिक उपचारांवर भर देण्यात




येतो. मणक्याशी संबंधित आजार, पाठदुखी, कंबरदुखी, सांध्यांचे आजार तसेच अपघातांतील दुखापती यांसाठी येथे अत्याधुनिक उपचारपद्धतींचा वापर करून उपचार केले जातात. मिनिमली इन्वेसिव्ह स्पाईन सर्जरी, स्पाईन फ्युजन सर्जरी, गुडघा व हिप प्रत्यारोपण, ट्रॉमा सर्जरी आणि स्पोर्ट्स इंज्युरी उपचार अशा विविध वैद्यकीय सेवा येथे उपलब्ध आहेत. याशिवाय रुग्णालयात फिजिओथेरपी, वेदना व्यवस्थापन, जनरल मेडिसिन आणि आपत्कालीन उपचार सेवा देखील दिल्या जातात.

रुग्णांच्या सोयीसाठी अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, आयसीयू, डिजिटल एक्स-रे आणि फिजिओथेरपी विभागाची व्यवस्था करण्यात आली आहे. २४ तास वैद्यकीय सेवा आणि अनुभवी कर्मचाऱ्यांची उपलब्धता असल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीतही रुग्णांना तत्काळ उपचार मिळू शकतात. अनुभवी डॉक्टरांची टीम, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने रुग्णांना सुरक्षित व प्रभावी उपचार देण्यावर येथे भर दिला जातो.

गेल्या काही वर्षांत हजारो यशस्वी शस्त्रक्रिया आणि उपचारांमुळे कानवडे हॉस्पिटलने आरोग्य क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. विशेषतः मणक्याच्या शस्त्रक्रियेमधील यशस्वी उपचारांमुळे अनेक रुग्णांनी नव्याने आयुष्य जगण्याचा आत्मविश्वास मिळवला आहे. ऑपरेशननंतर रुग्ण दुसऱ्याच दिवशी चालू-फिरू शकतात, तसेच अल्पावधीत पुन्हा दैनंदिन कामे करू लागतात, ही या रुग्णालयाची विशेष बाब मानली जाते.

कानवडे हॉस्पिटलच्या इन्स्टाग्रामसह विविध समाजमाध्यमांवर रुग्णांचे अनुभव आणि सकारात्मक प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात. रुग्णांसाठी विविध जनआरोग्य योजना उपलब्ध करून देण्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनाही दर्जेदार आरोग्यसेवा सहज उपलब्ध होत आहे. परवडणाऱ्या दरात आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेले कानवडे हॉस्पिटल आज संगमनेर परिसरातील नागरिकांसाठी एक विश्वासार्ह आरोग्यकेंद्र म्हणून ओळखले जात आहे.


KANAWADE HOSPITAL & SPINE CARE CENTRE
देवाचा मळा, म्हाळंगी पुलासमोर, राजापूर रोड, संगमनेर
टेलि. (०२४२५) २२६१०१
मोबाईल - ९१११२३७७८८८
Niramay Clinical Laboratory
Darshan Khalkar
(B.sc. MLT DMLT, D.Pharm DYN)



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25